# साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे

साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

☎ ०२०-२५५३८०४१/४२/४३/४४ commsugar.fin@gmail.com


जा.क्र.सा.आ/कक्ष-७/अर्थ-१/हं.१८-१९/RSF दर/प्रसृत/२०२३ दिनांक:- २५ / ०८/२०२३

**विषय** :- महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन नियम, २०१६ चे नियम ९(५) अनुसार RSF दर प्रसृत करणेबाबत.

**संदर्भ**:- १) महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊसदराचे विनियमन अधिनियम, २०१३ व नियम-२०१६.

२) ऊस नियंत्रण मंडळाची बैठक, दिनांक १७/०७/२०२३

महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊसदराचे विनियमन अधिनियम २०१३ मधील व नियम २०१६ मधील तरतुदीनुसार महसुल विभागणी सुत्रानुसार निघणारा ऊसाचा दर निश्चित करण्याचा अधिकार ऊस नियंत्रण मंडळास आहे. नियम ९(५) नुसार ऊस नियंत्रण मंडळाने बैठकीत निश्चित केलेले दर प्रसृत करण्याची तरतुद आहे. तसेच ज्या कारखान्यांनी मंडळाने मान्[illegible]क्षा जादा दर दिला असेल अशा कारखान्यांनी जादा ऊसदराचे प्रस्ताव साखर आयुक्तालयाकडे मंजूरीसाठी स्वतंत्ररित्या सादर करावयाचे आहे. ज्या कारखान्यांनी मंडळाने निश्चित केलेल्या RSF दरापेक्षा कमी दर अदा केला आहे अशा कारखान्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत दर अदा करणे बंधनकारक आहे. अन्यथा दर अदा करण्यास कसुर केल्यास त्यावर १२% वार्षिक दराने व्याज आकारण्याची तरतुद आहे.

ऊस नियंत्रण मंडळाच्या दिनांक १७/०७/२०२३ च्या बैठकीत सोबत जोडलेल्या यादीतील २६ कारखान्यांचे हंगाम २०१८-१९ मधील महसुली विभागणी सुत्रानुसार (RSF) निघणारे दर सादर करण्यात आले होते आणि मंडळाने विषय क्रमांक ३ अन्वये RSF नुसार निघणा-या दरास मान्यता दिली आहे. यास्तव महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन नियम-२०१६ मधील नियम ९(५) च्या तरतुदीनुसार RSF दर प्रसृत करणेकरीता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

(कृ.मा.पहा)

## आदेश

महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन नियम-२०१६ मधील नियम ९(५) च्या तरतुदी अनुसार २६ साखर कारखान्यांचे (RSF) दर प्रसृत करणेचे आदेश देण्यात येत आहे. (सोबत यादी जोडली आहे.)

(डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार)
सदस्य सचिव ऊस नियंत्रण मंडळ तथा
साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१) प्रादेशिक सहसंचालक (साखर), सर्व

२) विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) (सर्व)

प्रतिलिपी:-

१) मा. अपर मुख्य सचिव, (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

२) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव

ऊस नियंत्रण मंडळाने दिनांक १७/०७/२०२३ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेले हंगाम २०१८-१९ मधील RSF दर

| अ.क्रं. | जिल्हा | साखर कारखान्याचे नाव | आर.एस. एफ. दर प्रमेट RSF/M.T |
|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | श्री.तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि. | २४१७.६२ |
| २ | कोल्हापूर | इको केन शुगर्स एनर्जी लि., | २००६.९३ |
| ३ | सांगली | श्री महाकाली सहकारी साखर कारखाना लि. | १७८१.३९ |
| ४ | सांगली | श्री दत्त इंडिया प्रा. लि.(वसंतदादा सहकारी साखर कारखाना लि. ) | २३५५.३५ |
| ५ | सांगली | दालमिया भारत शुगर अँड इंड. लि. | २४४३.०९ |
| ६ | सांगली | यशवंत शुगर ॲन्ड पॉवर लि. | १६९२.२१ |
| ७ | सोलापूर | आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि. | १७२८.११ |
| ८ | सोलापूर | श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि. | २०५२.७७ |
| ९ | सोलापूर | लोकमंगल ॲग्रो इंडस्ट्रिज लि. | १९२८.४७ |
| १० | सोलापूर | लोकमंगल शुगर इथेनॉल ॲन्ड को-जनरेशन इंडस्ट्रीज लि. | १६२१.१९ |
| ११ | सोलापूर | जाकराया शुगर लि. | २०२६.९४ |
| १२ | सोलापूर | युटोपियन शुगर लि. | १५९६.५५ |
| १३ | सोलापूर | गोकुळ शुगर इंडस्ट्रिज लि | १५०१.४८ |
| १४ | सोलापूर | सिताराम महाराज शुगर लि. | १६५२.१४ |
| १५ | सोलापूर | विठ्ठल रिफाइन्ड शुगर्स लि. | १८४२.६३ |
| १६ | उस्मानाबाद | लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लि. | १५४२.६१ |
| १७ | अहमदनगर | पियुष शुगर लि. | १६१२.१७ |
| १८ | नाशिक | धाराशिव साखर कारखाना लि., युनिट-२ (वसंतदादा पाटील सहकारी साखर कारखाना लि.) | १५१५.६० |
| १९ | जळगाव | अंबाजी शुगर्स प्रा लि. (बेलगंगा सहकारी साखर कारखाना लि. ) | १०६७.५३ |

साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य सत्यमेव जयते पुणे-४११००५

ऊस नियंत्रण मंडळाने दिनांक १७/०७/२०२३ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेले हंगाम २०१८-१९ मधील RSF दर

| अ.क्रं. | जिल्हा | साखर कारखान्याचे नाव | आर.एस. एफ. दर प्रमेट RSF/M.T |
|---|---|---|---|
| २० | औरंगाबाद | सचिन घायाळ शुगर लि. ( श्री संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि.) | १५२३.३० |
| २१ | औरंगाबाद | घृष्णेश्वर शुगर्स प्रा. लि. | १४०८.३३ |
| २२ | जालना | समृध्दी शुगर्स लि. | १८५१.४२ |
| २३ | परभणी | गंगाखेड शुगर अॅण्ड एनर्जी लि. | १६८२.२६ |
| २४ | वर्धा | मानस अॅग्रो इंडस्ट्रीज  अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. युनिट -३ | १४६०.०९ |
| २५ | नागपूर | मानस अॅग्रो इन्डस्ट्रिज अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. युनिट -१ | १५३३.३० |
| २६ | भंडारा | मानस अॅग्रो इंडस्ट्रीज अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. युनिट -४ | १९८४.९९ |

( डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार)
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणे